MAHARASHTRA POLICE MEGA CITY

# MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OP HOUSING SOCIETY LTD.

Lohegaon, Pune

Registration No. PNA/PNA/(4)/HSG/(TO)/1342/2010
Office : Ganga Complex, Flat No. 1, 1st Floor, Above Bafna Hardware, Airport Road, Yerwada, Pune-411 006 (Mah) India
Tel/Fax : (020) 26689014/15 Email : mpmcpune@gmail.com
Website : www.mpmcpune.com

क्र.एमपीएमसी/वार्षिक सभा/२०२१/१८२०९
पुणे, दिनांक-२७/०९/२०२१

प्रति,
सन्माननिय सभासद
महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी
गृहरचना संस्था मर्यादित लोहगाव, पुणे.

विषय- वार्षिक सर्वसाधारण सभेची नियोजित तारीख पुढे ढकलण्याबाबत
संदर्भ- वार्षिक सर्वसाधारण सभेचे सुचनापत्र
जा.क्र.एमपीएमसी/एजीएम/२०२१/९२०९-१७६२३ दि.३१/०८/२०२१

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०/०९/२०२१ रोजी दृकश्राव्य माध्यमातून घेण्याचे ठरले होते व तसे आपणांस कळविण्यातही आले होते. परंतू महाराष्ट्र शासनाने दि.२५/०९/२०२१ रोजी जाहीर केल्याप्रमाणे राज्यातील कोरोनाचा संसर्ग कमी झाल्याने शाळा, धार्मिक स्थळे, चित्रपटगृहे, नाट्यगृहे इ. टप्प्याटप्प्याने चालू करण्यास परवानगी दिली आहे. म्हणून आपल्या गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा दृकश्राव्य माध्यमातून घेण्याऐवजी प्रत्यक्ष बांधकाम स्थळावर घेतल्यास प्रत्यक्ष पाहणीनंतर सभासदांना त्यांच्या प्रश्नांची थेट व सविस्तर उत्तरे मिळतील हा विचार करून संस्थेच्या कार्यकारणीने दि.३०/०९/२०२१ ची नियोजित वार्षिक सर्वसाधारण सभा, डिसेंबर २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात घेण्याचे आयोजित केले आहे. शासनाने सुध्दा दि.२२/०९/२०२१ च्या निर्णयानुसार सर्व सहकारी संस्थांना त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी दि. ३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

पुढे ढकलण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे स्थळ, तारीख व वेळ सर्व सभासदांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल तसेच यापुर्वी पाठविलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचना पत्रातील विषय आणि थकबाकीदारांना दिलेल्या कारणे दाखवा सुचना (नोटीस) तोपर्यंत वैध व परिणामकारक राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

संचालक मंडळाच्या दि.२७/०९/२०२१ रोजीच्या बैठकीतील ठरावाप्रमाणे.

27/9/21
सचिव
(महंमदरफी खान)
महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी
गृहरचना संस्था मर्यादित लोहगाव, पुणे.